# शिक्षण विभाग (माध्यामिक)
# जिल्हा परिषद,यवतमाळ.

## खाते प्रमुखाचे नांव :- शिक्षणाधिकारी (माध्यामिक)
## विभागाचा दुरध्वनी क्रमांक :- ०७२३२-२४१५२९

## या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची सविस्तर माहिती

**१) इयत्ता ११ वी, १२ वी मध्ये मुलींना मोफत शिक्षण :-**

शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एफईडी-१९८३/१५६७२/साशि-५ दिनांक २४ ऑगष्ट १९८३ अन्वये राज्यातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांतील मुलींना इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय जाहीर केला . त्यांनतर पुन्हा शासनाने राज्यातील सर्वच मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या हेतुने ६ फेब्रुवारी १९८७ पासुन १ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण सर्वच मुलींना मोफत केलेले आहे. या योजनेचा समावेश १ ली ते १० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण या योजनेत १९९६-९७ पासुन झाला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत इयत्ता ११ वी १२ वी या दोन इयत्तातील फक्त मुलींचा समावेश या योजनेत होतो. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | १७१० | १३६०००/- |
| २०१२-१३ | १७०८ | ११७७३६/- |
| २०१३-१४ | १७३२ | १४२३२८/- |

**२) माध्यमिक शाळेतील मुलींना राष्टीय योजनेतुन प्रोत्साहनपर भत्ता :-**

१. सन २००९-१० पासुन राज्यातील इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या मुलींना या योजनेतंर्गत रु. ३०००/- प्रोत्साहनपर भत्ता देण्यात येतो.
२. माध्यमिक स्तरावर मुलींची गळती टाळण्यासाठी अनुसुचित जाती / जमाती संवर्गातील मुली वयाच्या १८ वर्षापर्यंत शिक्षण व्यवस्थेत टिकण्यासाठी.

मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | लाभार्थ्याचे प्रस्ताव संचालनालयास सादर केले आहे. |
|---|---|---|
| २०११-१२ | २२७९ | |
| २०१२-१३ | १९६१ | |
| २०१३-१४ | १२६४ | |

**३) राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (N.M.M.S.)**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना केंद्र पुरस्कृत असुन इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्याची परीक्षा घेउन राज्यस्तरीय परीक्षेतुन जिल्हा निहाय तयार केलेल्या गुणवत्ता यादीतुन राज्याला ठरवुन दिलेल्या कोट्यानुसार जिल्हा निहाय निवडलेल्या उमेदवारांची निवड यादी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत केली जाते व अशा निवड केलेल्या विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती मंजुर केली जाते. सदर योजना सन २००७-०८ या वर्षापासुन सुरु करण्यात आली आहे. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्याचे ऑनलाईन अर्ज भरण्यात आले आह.

| वर्ष | पात्र विद्यार्थी संख्या | ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्याची संख्या |
|---|---|---|
| २००९-१० | ३११ | ३११ |
| २०१०-११ | ३४३ | ३४३ |
| २०११-१२ | ३३६ | ३३६ |

**४) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यासाठी मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती योजना :**

अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी मा. प्रधानमंत्री यांनी १५ कलमी कार्यक्रमा अंतर्गत अल्पसंख्यांक समाजातील इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व शासकिय निमशासकिय खाजगी शाळामधुन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाने सुरु केली आहे. यामध्ये केंद्र हिस्सा ७५ टक्के व राज्य हिस्सा २५ टक्के शासन निर्णय दिनांक २३ जुलै २००८ नुसार इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या अल्पसंख्यास समाजातील विद्यार्थ्यासाठी सन २००८ -०९ पासुन सदरची योजना नव्याने राज्यात सुरु करण्यात आलेली आहे. अल्पसंख्याक समाजामध्ये केंद्र

शासनाने मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द व पारशी या धर्माचा समावेश केलेला आहे. सन २०१०-११ पासुन ही योजना ऑनलाईन झालेली असल्यामुळे सदर शिष्यवृत्ती शासन स्तरावरुन विद्यार्थ्याचे बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

| वर्ष | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची संख्या |
|---|---|
| २०११-१२ | १८८२० |
| २०१२-१३ | २०४११ |
| २०१३-१४ | ५३०० |

सदर शिष्यवृत्तीची माहिती शाळास्तरावर होण्यासाठी संचालनालयामार्फत वेळोतेळी बैठकाचे आयोजन करण्यात येते. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमधुन (मराठी, उर्दु, इंग्रजी ) जाहिरातीव्दारे शिष्यवृत्तीची माहिती देण्यात येते.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याच्या खात्यामध्ये बॅक ऑफ महाराष्ट्र यांचे मार्फत सदर शिष्वृत्तीचे वितरण करण्यात येते त्यासाठी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याना रु. १० या नाममात्रे रकमेंत खाते उघडण्यात येते. ज्या ठिकाणी बॅक ऑफ महाराष्ट्र यांची शाखा नसेल त्या ठिकाणी इतर राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. सदरची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांचे खात्यावर E प्रधानाव्दारे अदा करण्यात येते. सन २०१२-१३ पासुन सदरची योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचे प्रस्तावित आहे.

५) **ग्रामीण भागातील हुशार आणि पात्र विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्या- होतकरु विद्यार्थ्याना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीः**

ग्रामीण भागातील हुशार आणि पात्र विद्यार्थ्याना दिनांक ४ डिसेंबर १९५९ व दिनांक २६ एप्रिल १९८३ च्या आदेशाप्रमाणे शिष्यवृत्या प्रदान केल्या जातात. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पुर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेच्या निकालावरुन या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. शासन निर्णय दिनांक २/८/१९९५ अन्वये, सदर शिष्यवृत्ती संचात व दरात १९९५-९६ या वर्षापासुन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. बृहन्मुंबई वगळुन राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी अ) वरिष्ठ प्राथमिक ब) माध्यमिक क) उच्च माध्यमिक या प्रत्येक शैक्षणिक स्तरावर ३ संचाऐवजी १० संच मंजुर करण्यात आले आहे. शिष्यवृत्याचे सध्याचे सुधारित दर व मंजुर संच खालीलप्रमाणे आहेत अशैक्षणिक वर्षात १० महिन्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सन २०१०-११ पासुन ही योजना ऑनलाईन झालेली असल्यामुळे सदर शिष्यवृत्ती शासन स्तरावरुन विद्यार्थ्याचे बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन भरण्यात आले आहे.

| वर्ष | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची संख्या |
|---|---|
| २०११-१२ | १०७१ |
| २०१२-१३ | ९८७ |
| २०१३-१४ | ९३७ |

**६) टंचाईग्रस्त भागातील १० वी, १२ वीचे विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/ प्रतिपुर्ती :-** शासन निर्णय क्रमांक एमईडी /१५९२/१२०२/(११३२)/साशि-५ दिनांक १८/१०/१९९३ अन्वये, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विहित केलेल्या दराने संबंधितांना परीक्षा फी ची प्रतिपुर्ती करण्यात येते. या योजनेअंतर्गत शासनाने अवर्षण व टंचाई जिल्ह्यात घोषित केल्यास १० वी आणि १२ वी चे विद्यार्थ्यांना बोर्डाची परीक्षा फी माफ करण्यात येते. सन २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंत जिल्ह्यात शासनाने टंचाई घोषित केलेली नाही. मा. जिल्हाधिकारी यांचे कडुन यादी प्राप्त होताच, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

**७) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्याना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीः**

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील हुशार मुले / मुली जे माध्यमिक शालात परीक्षेत पहिल्याच वेळी शेकडा ५० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण झाले आहेत. अशाना पुढील उच्च शिक्षणापासुन वंचित राहु नये म्हणुन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक एससीएच/ ८५/ ९५/माशि-८ दिनांक १५/१०/९६ च्या निर्णयाअन्वये ३२०० शिष्यवृत्त्या मंजुर केल्या आहेत. ही शिष्यवृत्ती फक्त कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठी उपलब्ध आहे. सन ९८-९९ पासुन शिष्यवृत्तीची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| अनु. | इयत्ता ११ वी १२ वी | मंजुर संच | दर |
|---|---|---|---|
| १ | विज्ञान शाखा | २००० | १) वसतीगृहात न राहणा-या मुलांसाठी रु. ८०/- द.म.मुलींसाठी रु. १००/- द.म. २) वसतीगृहात न राहणा-या मुलांसाठी रु. १४०/- व मुलींसाठी रु. १६०/- द.म. दहा महिन्यासाठी फक्त |
| २ | वाणिज्य शाखा | ८०० | |
| ३ | कला शाखा | ४०० | |

इयत्ता ११ वी मध्ये ५० टक्के गुण मिळवुन पहिल्याच वेळी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती १२ वी पर्यंत चालु राहते. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | ८२ | ७५८००/- |
| २०१२-१३ | ११५ | ९७३४०/- |
| २०१३-१४ | ११५ | १०१५६०/- |

**८) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षणः** राज्यातील शासकिय मान्य खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, या मधील प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना, मुलींना फी, माफीची सवलत शा.नि.क्र.पीआरई/ ७०६७/एफ, दि. १८/६/१९६८ अन्वये, देण्यात येते शा.नि.क्र.पीआरई/ ७०८१/१५५५४७ (१२११) जीइएन -५, दि. २५/३/१९८१ पासुन माध्यिमक शाळांना जोडल्या गेलेल्या इ. ५वी ते ७ वी च्या वर्गांना शिकविणा-या एस एस सी. डी.एड. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण जाहिर झाले. शा.नि.क्र.एफईडी-१०९६ २१८६/ ९६/(२७०/९८) माशि-८, दि. ३/२/१९९९ अनुसार विना अनुदानित शिक्षण संस्थेतील वैद्यकिय, अभियांत्रिकि व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदवी प्राप्त करण्यासाठी (मुक्त जागी) प्रवेश मिळालेल्या तसेच विना अनुदानित संस्थेमधील इतर मान्यताप्राप्त सर्वसाधारण अभ्यासक्रमासाठी ज्याकरिता प्रमाणित दराने फी आकारली जाते . मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | २०१ | २१४०००/- |
| २०१२-१३ | १९८ | २२४४३७/- |
| २०१३-१४ | २८२ | १७६३७०/- |

**९) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालयातील अध्यापकांच्या अध्यापकेतर कर्मचा-यांचे पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण :**

शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एफईडी/१०९५/५४७८२ ( १७७९/९५) साशि-५, दिनांक १९.८.१९९५ अन्वये १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासुन राज्यातील अनुदानित अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शाळा व अध्यापक विद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचे पालयांना सर्व स्तरावर मोफत शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेखाली शिक्षण शुल्क, प्रवेश शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व परीक्षा शुल्क यांची प्रतिपुर्ती करण्यात येते. इ. १० वी पर्यंत सर्वांना निःशुल्क शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित असल्याने या योजनेचा लाभ उच्च माध्यमिक स्तर व तत्सम अभ्यासक्रमाखालील अनुदानित इतर लाभार्थी तसेच पदवी / पदव्युत्तर स्तरावरील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी / विद्यार्थीनींना देण्यात येतो. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | १९५ | २३२०००/- |
| २०१२-१३ | ३११ | २३४४६४ |
| २०१३-१४ | १४९ | १७८२८९/- |

**१०) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती :**

शासन निर्णय क्र. एमआयएस/१४६५-एच, दि.२३ नोव्हेंबर १९६५ पासुन ही योजना अमंलात आणली तसेच शिक्षण व सेवायोजना विभाग शासन निर्णय क्र.एफएफई १०८८ (५४३ / ८४) साशि-५५ दि. ३१ डिसेंबर १९९० अन्वये, गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना १९९०-९१ च्या शैक्षणिक वर्षापासुन ही शुल्क माफी सवलत दिली जात आहे. शासन निर्णय क्र. एनडीएफ १०९४/(१६६८/९४) साशि-५ दिनांक १३ सप्टेबर १९९४-९५ पासुन शिष्यवृत्ती व पुस्तक अनुदानाच्या दरात वाढ केली आहे. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | ८ | १४५०/- |
| २०१२-१३ | ९ | १३५०/- |
| २०१३-१४ | ३ | ३९९/- |

**११) मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री यांनी घोषित केलेले विशेष पॅकेज अंमलबजावणी विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांतर्गत द्यावयाच्या शैक्षणिक सवलती:**

शासन निर्णय क्रमांक एफईडी-२००९/ (०६/०९)/ केंपुया, दिनांक २७ फेब्रुवारी २००९ अन्वये पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ बुलढाणा, वाशिम व वर्धा या सहा जिल्ह्यातील अत्यंत अडचणीत असलेल्या शेतक-यांच्या ४३४२९१ कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत देण्यासाठी खालील सर्व बाबींस प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

१) वरील जिल्ह्यातील अत्यंत अडचणीत असलेल्या ४३४२९१ कुटुंबातील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शासकिय दरानुसार पावतीच्या आधारे संपुर्ण प्रवेश व शैक्षणिक शुल्काचा परतावा अदा करणे.
२) सदर कुटुंबातील इयत्ता १० वी व १२ वी च्या शालांत परीक्षेला बसणा-या सर्व विद्यार्थ्यास शासकिय दरानुसार संपुर्ण परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.
३) तसेच प्रस्तुत कुटुंबातील शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास वह्या, पुस्तके व इतर किरकोळ खचा्रपोटी किमान रु. ५००/- वार्षिक अनुदान शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस संबंधित संस्थांच्या मार्फत अदा करण्यात यावे.
४) सदर योजना इयत्ता १ ली ते १२ वी च्या सर्व शासकिय / निमशासकिय/ शासकिय अनुदानित / विनाअनुदानित खाजगी शांळामधुन शिक्षण घेणा-या पात्र लाभार्थीना लागु असेल

उपरोक्त योजनेसाठी लाभार्थीचे पुनःसर्वेक्षण व पुनःप्रमाणिकरण जिल्हाधिका-यांमार्फत करण्यात येणार असुन, जिल्हाधिका-यांनी प्रमाणित केलेल्या लाभार्थीनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल.

सदर योजनेकरिता पुढील लेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहे. मागणी क्र.-ई-२, २२०२ सव्रसाधारण शिक्षण -८०- सर्वसाधारण, ८०० इतर खर्च (०२) (४९), विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शैक्षणिक सवलती, २२०२ एच १५१ दत्तमत ३१ सहाय्यक अनुदाने. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | २५४६२ | १८५७००००/- |
| २०१२-१३ | २५५६६ | १२२१८००/- |
| २०१३-१४ | २१०८१ | १०५७६८००/- |

**१२) आय.सी.टी. (Information & Communiation Technology in Schools ) केंद्र पुरस्कृत योजना :**

सन १९८४-८५ पासुन देशात CLASS ( Computer Literacy & Studies in Schools) ही योजना सुरु झाली. या योजनेमध्ये शाळांना फक्त संगणकांचा पुरवठा करण्यात आला होता. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सुधारित **क्लास** योजना व एज्युकेशन टेक्नॉलॉजी या दोन कार्यक्रमांतर्गत शाळांच्या संगणकीकरणास गती आली.

केंद्र शासनाने आय.सी.टी. ही योजना माहे डिसेंबर, २००४ पासुन सुरु केली आहे. राजयात सन २००७-२००८ पासुन ही योजना सुरु झाली असुन पहिल्या टप्प्यात ५०० व दुस-या टप्प्यात २५०० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना (ICT) प्रयोगशाळा देण्यात आलेल्या आहेत. सन २०१३-१४ पर्यंत १२३ शाळा संगणकिय झालेल्या आहेत.

**१३) प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरु करणे :-**

१) योजनेचे नांव प्रस्तावाना :- प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरु करणे

२) योजना / कार्यक्रमाचे स्वरुप/ माहिती व व्याप्ती :- शिक्षण विभागाकडील क्रमांक इसशा-१०९५ (२७८ / ९५) माशि-८ दिनांक २६ सप्टेबर १९९५ अन्वये राजयात प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे सैनिकी शाळा १९९६ -९७ पासुन सुरु करण्यास सक्षम, स्वयंसेवी संस्थांना परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. वर्ष २००४-२००५ पर्यंत राज्यातील ३२ जिल्ह्यात ३८ सैनिकी शाळा सुरु झालेल्या आहेत. त्यापैकि पुणे औरंगाबाद, बुलढाणा या जिल्ह्यांत मुलींच्या सैनिकि शाळा सुरु झाल्या असुन जळगाव, धुळे, औरंगाबाद, सातार या जिल्ह्यांत सहशिक्षणाच्या सैनिक शाळा सुरु झाल्या आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सांघिकवृत्ती, शिस्त, नेतृत्व आत्मविश्वास, शौर्य, देशभक्ती इत्यादी गुणांची जोपासना व्हावी व आत्मीय विकास व्हावा हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश घेउन तरुणांनी राष्ट्रसेवा करावी. या व्यापक उद्देशाने शासनाने ही योजना कायान्वित केली आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.

शासन निर्णय क्रमांक १०००१/(१८५-२००१) / माशि-७/ दिनांक ०५ जुलै २००२ अन्वये वर्ष २००२-२००३ पासुन सैनिकी शाळांना जोडुन कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग जोडण्यास शासनाने परवानगी दिली आहे. सन २००४-२००५ पर्यंत ११ सैनिक शाळांत उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु झाले आहेत.

२००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासुन वार्षिक शुल्क रुपये १५,०००/- करण्यात आले आहे. तसेच एका तुकडीत ४० विद्यार्थ्यांच्या ऐवजी ४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात शासनाने परवानगी दिलेली आहे.

**१४) आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन :**

गरीबीमुळे आदिवासी विद्यार्थी-विद्याथीनीचे शाळेत उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी आहे ते नियमित शाळेत उपस्थित राहावेत याकरिता त्यांना मोफत गणवेश, पुस्तके, पाटया इत्यादी साहित्य पुरविण्यात येत असले तरीही ते शाळेत येत नाहीत म्हणून त्या मुलांना शाळेत येण्याकरिता प्रोत्साहन मिळावे या उद्येशाने त्यांना विद्यावेतन देण्याची योजना शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य विभाग क्रमांक टीएसी-१३७७/इडी-२२६०७/१२०८-(एसी) -१५ / पर्यटन दिनांक ११ ऑगष्ट १९७७ अन्वये राबविण्यांत येत आहे. या योजनेद्वारे अनूसुचित जमातीच्या (इयत्ता५वी ते १० ) विद्यार्थ्यांना वर्षाला रुपये ५०० सरासरी विद्यावेतन देण्यांत येते.

| **इयत्ता** | **मुलांना** | **मुलींना** |
|---|---|---|
| ५ वी ते ७ वी | रुपये ४० | रुपये ५० |
| ८ वी ते १० वी | रुपये ५० | रुपये ६० |

ज्या ठिकाणी मोफत राहण्याची व जेवणाची सोय असते अशा आश्रम व निवासी शाळेतील विद्यार्थी विद्यावेतनास पात्र नाहीत. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

| वर्ष | विद्यार्थी संख्या | अदा केलेली तरतुद |
|---|---|---|
| २०११-१२ | ३८६ | १६८१००/- |
| २०१२-१३ | १०४ | ४४०००/- |
| २०१३-१४ | ७९ | ३३८००/- |

**१५) भारत सरकारकडून अनुदानित व प्रायोजित नवोदय विद्यालये**

१. योजनेचे नांव प्रस्तावना

भारत सरकाकडून अनुदानित व प्रायोजित नवोदय विद्यालये

राज्य शासनाच्या मदतीने आयुक्त नवोदय विद्यालय समिती ही योजना राबविते.

एन.टी.एस NTS:-

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन.सी.इ.आर.टी.) यांनी २०१२-१३ पासून प्रज्ञाशोध परिक्षा इ.१० वी साठी दोन स्तरांवर घेण्याचे ठरविले आहे.

राज्यस्तर प्रज्ञा शोध परिक्षाः-

महाराष्ट्र राज्यासाठी ही परिक्षा, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत जिल्हातील विविध केंद्रावर सर्वसाधारण नोव्हेंबर महीण्याच्या दुस-या/तिस-या रविवारी घेण्यात येते. यावर्षी दि.१८/११/२०१२ ऐवजी २१/१२/२००१२ रोजी घेण्यात आली आहे. या परीक्षेसाठी दि.२१/११/२०१२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत १०२० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे.

राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परिक्षा :- राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी, दिल्ली (NCERT)यांच्यामार्फत सदर परिक्षा मे महिण्यात घेण्यात येईल (या वर्षी १२/०५/२०१३ ) राष्ट्रीयस्तर परीक्षा महाराष्ट्रातील पूणे व मुंबई केंद्रावर घेईल. राज्यस्तरीय परीक्षा यातून राष्ट्रीयस्तरासाठी निवड झालेल्या उमेदवारांनाच अंतिम परक्षिस बसता येते.

१ ऑगष्ट पासून ऑनलाइन आवेदनपत्रे परिषदेच्या वेबसाईटवर(http:/www.mscepune.in)

शिष्यवृत्ती :- अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्तीची संख्या १००० असून यासाठी SCसाठी १५०, STसाठी ७५ आणि खुल्या प्रवर्गासाठी ७७५ शिष्यवृत्या ठरवून दिलेल्या आहेत. तसेच संबंधित संवर्गात ३% अंपगासाठीचे आरक्षण असेल.

शिष्यवृत्ती दर :- ५०० रु महिण्याप्रमाणे वर्षाकाठी ६०००/- सहा हजार रुपये वर्ग १२ वी पर्यंत मिळतात शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळू शकतात.

शिष्यवृत्ती :-विद्यार्थी परिक्षेत पात्र ठरल्यास वर्ग ९ वी ते १२ वी पर्यंत ५००/- महिन्या प्रमाणे शिष्यवृत्ती दिल्या जाते. ही सर्व रक्कम विद्यार्थ्याच्या बँक खात्यात शासामार्फत जमा केली जाते.

**१६) इस्पायर अवार्ड योजनाः-** ही योजना सन २०१०-११ व ११-१२ या वर्षामध्ये इन्सपायर्ड अवार्ड प्रदर्शन यवतमाळ जिल्हयामध्ये घेण्यांत आलेले आहे.या प्रदशार्नातुन मागील वर्षी २०१०-११ मध्ये राष्ठ्रीय पातळीवर १५ विद्यार्थ्याची निवड करण्यांत आली होती.तसेच २०१२-१३ मध्ये ९४२ विद्यार्थ्यांनी जिल्हा पातळीवर इन्सपायर्ड अवार्ड प्रदर्शनात सहभाग झालेला होता. त्या प्रदर्शनातुन राज्यस्तरीय प्रदर्शनाकरिता ६९ विद्यार्थ्याचा राज्य स्तरीय प्रदर्शनामध्ये सहभाग होता व त्यामधुन ६ विद्यार्थ्याचा राष्ट्रीय पातळीवर निवड करण्यांत होती . ही योजना वर्ग ६ ते १० मधील शिकत असणा-या एका शाळेतुन एका विद्यार्थ्यांना ५०००/-रु. प्रमाणे धनादेश केंद्र शासना मार्फत विद्यार्थ्याचे नावाने दिल्या जातो या ५०००/- रु रकमेतुन विद्यार्थ्याकडुन उत्कष्ठ विज्ञान

प्रतिकृती तयार करिता व राज्य स्तर व जिल्हा स्तर पर्यत जाणे-येणे त्या रकमेत समाविष्ट आहे. मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

| वर्ष | जिल्हास्तरीत सहभाग | राज्यस्तरीत सहभाग | राष्ट्रीय स्तरीत सहभाग |
|---|---|---|---|
| २०१०-११ | १२८७ | ९७ | १५ |
| २०११-१२ | २०२ | १५ | ०१ |
| २०१२-१३ | ९४२ | ६९ | ०५ |

**१७) आम आदमी विमा योजना:-** या योजनेअंतर्गत १ हेक्टर ओलीत किंवा २ एकर कोरडवाहु शेती आहे. तसेच Licid , आणि दोन अपत्य आहेत. अशा लाभार्थ्याच्या पाल्यास ९ वी ते १२ वी पर्यंत, lic कडुन शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर विद्यार्थ्यास महाई-संग्राम केंद्रामधुन ऑनलाईन स्वखर्चाने अर्ज भरावा लागतो. त्यासाठी गावातील तलाठी यांचेशी संपर्क साधाणे आवश्यक आहे. तसेच संबधीत शाळेचे मुख्याध्यापक सुध्दा मदत करतील. मागील दोन वर्षात खालीलप्रमाणे अर्ज ऑनलाईन भरण्यात आले.

| वर्ष | उदिष्ट | ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जाची संख्या |
|---|---|---|
| २०१२-१३ | ३५००० | ११०९६ |
| २०१३-१४ | ६४००० | २३७२० |

**१८) मानव विकास योजना:-** या योजनेत **१) इयत्ता १० वी व १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे.:-** १० वी करिता ९७ वर्ग व १२ वी करिता ४१ वर्ग सुरु करण्यात आले आहे. निकाल लागल्यामुळे दुस-या टप्यातील ९ तालुक्यात घाटंजी, झरी, पांढरकवडा, कळंब, मारेगांव, आर्णि, पुसद, उमरखेड, महागांव येथे वर्ग सुरु करण्यात आले आहे. सन २०१३-१४ मध्ये जुलै ते सप्टे. ०१३ या पहिल्या टप्प्यात ३१ वर्ग सुरु करण्यात आले होते. त्याकरिता रु. १४९९०००/- एवढी शिक्षक व समन्वयक मानधनाची तरतुद करण्यात आली आहे. सदर खर्चाचे देयक मंजुरीचे प्रतिक्षेत आहे. तसेच डिसेंबर ०१३ ते फेब्रुवारी ०१४ दरम्यान शिकवणी वर्गाचा दुसरा टप्पा पार पडला. यात इयत्ता १० वी चे २५२७ तर इयत्ता १२ वी चे ९०० विद्यार्थी सहभागी होत. या वर्गाच्या शिक्षक व समन्वयक मानधनाकरिता रु. ११६३०००/- तरतुद करण्यात आली. गट शिक्षणाधिकारी यांच्याकडुन देयक प्राप्त होताच सदर देयक मंजुर करण्यात येईल.

**२) मोठ्या गावातील माध्यमिक शाळांमध्ये अभ्यासीका सुरु करणे:-** या योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये १९२ शाळांना सोलर लाईट,पुस्तके, व कपाट पुरविण्यात आले. तसेच सन २०१२-१३ मध्ये ११ शाळांमध्ये मुलींकरिता स्वतंत्र अभ्यासीका सुरु करण्यात आल्या.

**३) अनुदानीत शाळांना प्रयोगशाळा साहीत्य पुरविणे :-** या योजनेअंतर्गत २०११-१२ व १२-१३ मध्ये एकुण २४६ शाळांना रु. २५०००/- चे मर्यादेत विज्ञान प्रयोगशाळा साहीत्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

**४) तालुका बालभवन विज्ञान केंद्र स्थापन करणे :-** या योजनेअंतर्गत ९ तालुक्यातील तालुकास्थळी प्रत्येकि १ या प्रमाणे ९ तालुका बालभवन विज्ञान केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर विज्ञान केंद्राला इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भेटीस प्रोत्साहित करणेसाठी प्रती विद्यार्थी रु. १० /- या प्रमाणे अनुदान देण्यात येत आहे.

**५) ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थीनीकरिता मोफत सायकल वाटप :-** या योजनेअंतर्गत ५०४३ मुलींची निवड करण्यात आली असुन, प्रति विद्यार्थीनी रु. ३०००/- याप्रमाणे रु. १५१२९०००/- इतका निधी प्राप्त झाला असुन, सदर निधी एसएमडीसी चे बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**